# 'रवींद्र केळेकर : जीवन आणि योगदान' विषयावर राष्ट्रीय परिसंवाद

टीम दैनिक हेराल्ड



**पर्वरी, दि. २५ :** गांधीवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, आधुनिक कोकणी चळवळीचे प्रणेते, भाषाशास्त्रज्ञ आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध साहित्यिक रवींद्र केळेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'रवींद्र केळेकर जीवन आणि योगदान' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा राष्ट्रीय परिसंवाद कोंकणी विभाग, शासकीय कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, केपे यांच्या पुढाकाराने, साहित्य अकादेमी, गोवा कोकणी अकादेमी आणि रवींद्र भवन मडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ऑगस्ट रोजी परिषद सभागृह, रवींद्र भवन-मडगाव येथे आयोजित करण्यात आलेला आहे. दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्या या चर्चासत्राचे उद्घाटक केपे सरकारी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जयदीप भट्टाचार्य हे आहेत. तर बीजभाषक म्हणून कोंकणीतील सुप्रसिद्ध समीक्षक प्राचार्य भूषण भावे बीजभाषण करतील. प्रमुख पाहुणे गोवा कोकणी अकादेमीचे सचिव दामोदर मोरजकर, खास आमंत्रित गिरीश रवींद्र केळेकर, तर उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान गोवा कोकणी अकादेमीचे प्रभारी अध्यक्ष वसंत सावंत हे भूषवतील. उद्घाटनसत्राचे स्वागत साहित्य अकादेमीचे प्रभारी अधिकारी ओमप्रकाश नागर हे करतील तर प्रास्ताविक कोकणी सल्लागार मंडळ, साहित्य अकादेमीचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिगीज करतील. समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी लेखिका आणि संशोधिका सविता केरकर उपस्थित असतील. तर संपूर्ण परिसंवादांत मांडलेल्या शोधनिबंधांवरील मांडणीवरचे भाष्य केपे सरकारी महाविद्यालयातील कोकणी विभागातील प्राध्यापक सुशांत नायक करतील.

**रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील तत्त्वे आणि मूल्ये**

सकाळी ११.४५ वाजता सुरू होणाऱ्या पहिल्या सत्राचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. राजय पवार हे भूषवणार आहेत. रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील तत्त्वे आणि मूल्ये या विषयांतर्गत अनंत अग्नी (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातले तत्त्वज्ञान), नारायण देसाई (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील सौंदर्यतत्त्व) राजू नायक (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील निसर्ग आणि पर्यावरण) आदी मान्यवर तज्ज्ञ शोधनिबंध सादर करतील. **रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातला देश, प्रदेश आणि विश्व :** दुपारी २.३० वाजता सुरू होणाऱ्या दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. पूर्णानंद च्यारी हे भूषवतील. 'रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातला देश, प्रदेश आणि विश्व' या विषयांतर्गत डॉ. प्रकाश वझरीकर (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील भारतीयता) डॉ.हनुमंत चोपडेकर (कोकणी भाषिक चळवळीचे दिशादर्शक : रवींद्र केळेकर) पद्मश्री रमेश पै (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील वैश्विकता) आदी मान्यवर तज्ज्ञ शोधनिबंध सादर करतील.